**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

**क्रमांक : पशियो:२०२६/प्र.क्र.२४/शिक्षण-१** **दिनांक :१८ मार्च,२०२६**

**प्रति,**
**आयुक्त,**
**समाजकल्याण,**
**पुणे**

**विषय : <u>परदेश शिष्यवृत्ती योजना सन २०२६-२७ जाहिरात प्रसिध्द करणेबाबत</u>**

**संदर्भ : आपले पत्र क्र. सकआ/शिक्षण/परदेश शिष्यवृत्ती/जाहिरात/२०२६-२७/८३४/पुणे, दिनांक ०५.०३.२०२६**

महोदया,

आपण आपल्या संदर्भाधिन पत्रान्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या परदेश शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२६-२७ साठी विद्यार्थी निवडीबाबत महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभाग/आयुक्त, समाजकल्याण किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या यंत्रणेमार्फत वृत्तपत्रात तसेच शासनाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी जाहिरातीचे प्रारुप शासनाच्या मान्यतेस्तव सादर केलेले आहे.

२. सदर जाहिरातीच्या प्रारुपास मान्यता देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक **१५ मे, २०२६** अशी ठेवावी.

३. त्याचबरोबर आपण विचारणा केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने पुढीलबाबी आपणांस अवगत करण्यात येत असून, त्याची अंमलबजावणी/समावेश निवडप्रक्रिया राबविताना करावा.

अ) सन २०२६-२७ करिता परदेशातील विद्यापीठाचे **QSWR Ranking माहे जून २०२५** मध्ये प्रसारित महिन्याचे ग्राह्य धरावे.

**ब) सदर प्रक्रियेंतर्गत अर्ज भरण्याची अंतिम तारिख ही १५ मे, २०२६ असल्याने विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे उत्पन्नासाठी आर्थिक वर्ष सन २०२४-२५ चा दाखला ग्राह्य धरावा, त्याचबरोबर सोबत त्याने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात त्याच्या कुटुंबाचे उत्पन्न योजनेच्या निकषात नमुद केल्याप्रमाणे असेल याबाबत शपथपत्र देणे आवश्यक राहिल व अंतिम निवडीच्या अनुषंगाने गृहचौकशी दरम्यान त्याने सन २०२५-२६ चा उत्पन्नाचा दाखला देणे बंधनकारक राहिल.**

क) दरवर्षी योजनेच्या निकषानुसार ज्या तारखेला (दिनांक १ मे, २०२६) विद्यार्थ्यांचे वय ग्राह्य धरले जाते त्याच तारखेला वय निश्चिती करावी.

**ड) सन २०२६-२७ परदेश शिष्यवृत्तीच्या जाहिरातीमध्ये नमूद अटी शर्तीमध्ये काही बदल झाल्यास या विभागाचा निर्णय अंतिम राहिल हि बाब जाहिरातीच्या प्रारुपात समाविष्ट करण्यात यावी.**



Scanned with OKEN Scanner

३. उपरोक्त बाबी विचारात घेता आपण सादर केलेल्या राजर्षी शाहु महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२६-२७ या वर्षाकरीता विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता वृत्तपत्रात तसेच शासनाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यासाठी जाहिरातीच्या मसुद्यास मान्यता देण्यात येत असून, त्यानुसार विहीत वेळेत कार्यवाही करावी, हि विनंती.

आपला,

18.03.26

(सुरज गायकवाड)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति, निवडनस्ती (का.शिक्षण-१)



Scanned with OKEN Scanner